**निवडणुक / तात्काळ**

क्रमांक/अ.का.1/नपाप्र/कावि/ 324 /2017
जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ
दिनांकः-21.07.2017.

प्रति,

मुख्याधिकारी,
नगर परिषद,पांढरकवडा जि.यवतमाळ

विषयः- यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा नगर परिषदच्या प्रारुप प्रभाग रचनेस प्रसिध्दी देणबाबत.

संदर्भः- 1) मा.राज्य निवडणुक आयोग,महाराष्ट्र यांचे पत्र क्रं./रानिआ/नप2017/प्रं.क्र.11 /का-6दिनांक 13.06.2017.

000

मा.राज्य निवडणुक आयोग,महाराष्ट्र यांचे संदर्भीय आदेश पत्राचे अनुषंगाने यवतमाळ जिल्हयातील*क* वर्ग नगर परिषद ,पांढरकवडा सार्वत्रिक निवडणुकीकरिता दिनांक 20/07/2017 रोजी आरक्षण निश्चित करण्यांत आले असून संदर्भीय आदेश पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार दिनांक 24/07/2017 रोजी पर्यंत सदर प्रारुप प्रभाग रचनेचा मसुदा आपले संबंधीत नगर परिषद,पांढरकवडा कार्यालयाचे सुचना फलकावर प्रसिध्द करावयाचा आहे.

आपणास या अन्वये निर्देशित करण्यात येते की, मा.राज्य निवडणुक आयोग ,महाराष्ट्र यांनी पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार नगर परिषद पांढरकवडा च्या प्रारुप प्रभाग रचनेस पांढरकवडा नगर परिषदेचे कार्यालयाचे सुचना फलकावर दिनांक 24/07/2017 रोजी पर्यंत प्रारुप प्रभाग रचनेचा मसुदा प्रसिध्द करुन तसा प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास विनाविलंब सादर करावा. तसेच प्रभाग रचनेचा मराठी व इंग्रजी मसुदा या सोबत जोडला आहे.

तसेच सदर प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आली असल्याबाबत दि. 24.07.2017 पर्यंत आपल्या नगर परिषद क्षेत्रातील वृत्तपत्रात व्यापक प्रसिध्दी द्यावी व प्रसिध्दी दिलेल्या वृत्तपत्रांची कात्रणे या कार्यालयास सादर करावीत.

**जिल्हाधिकारी यवतमाळ**

सहपत्रः- प्रारुप प्रभाग रचनेचा मसुदा

प्रत-

1. मा.आयुक्त ,राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र नविन प्रशासन भवन ,मंत्रालयासमोर मादाम कामा रोड,मुंबई - 32 यांना माहितीस्तव सादर.
2. मा. प्रादेशिकसंचालक,नगरपरिषद प्रशासन अमरावती विभाग अमरावती यांना माहितीस्तव सादर.
3. तहसिलदार,केळापुर यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित त्यांना निर्देशित करण्यांत येते की, यवतमाळ जिल्हयातील नगर परिषद पांढरकवडाच्या प्रारुप प्रभाग रचनेच्या मसुद्यास केळापुर तहसिल कार्यालयाचे सुचना फलकावर दिनांक 24/07/2017 रोजी पर्यंत लावून प्रसिध्दी द्यावी व तसा प्रसिध्दी अहवाल सादर करावा.
4. जिल्हा नाझीर ,जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ यांना प्रसिध्दीकरिता अग्रेषित. त्याना निर्देशित करण्यांत येते की,यवतमाळ जिल्हयातील नगर परिषद ,पांढरकवडा प्रारुप प्रभाग रचनेच्या मसुद्यास जिल्हाधिकारी कार्यालय ,यवतमाळ येथील सुचना फलकावर दिनांक 24/07/2017 रोजी पर्यंत लावून प्रसिध्दी अहवाल सादर करावा.
5. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी यांनी, पांढरकवडा प्रारुप प्रभाग रचनेच्या मसुद्यास जिल्हाधिकारी कार्यालय ,यवतमाळ येथील वेब साईटवर दिनांक 24/07/2017 रोजी पर्यंत प्रसिध्दी करावा.

**जिल्हाधिकारी यवतमाळ**